CIDCO
WE MAKE CITIES

NIVARA KENDRA
Neutral Independent Verification Assessment foR Allotment

दिनांक : - ०१.०४.२०२१

# सिडको स्वप्नपूर्ती गृहनिर्माण व व्हॅलीशिल्प- एन.आर.आय गृहनिर्माण योजनेमधील अर्जदारांच्या अपील प्रक्रियेतील व स्वप्नपूर्ती, वास्तुविहार- उन्नती गृहनिर्माण योजनेच्या प्रतीक्षायादीवरील पुढील प्रक्रियेकरीता शिफारस केलेल्या व अपात्र ठरलेल्या अर्जदारांचा निकाल जाहिर

सिडको गृहनिर्माणयोजनेमधील दिनांक १५/०७/२०२० ते ३१/१०/२०२० च्या दरम्यान ज्या अर्जदारांनी कागदपत्रे जमा केली होती व दिनांक १८/०३/२०२० ते ११/०९/२०२०च्या दरम्यान कार्यान्वित केलेल्या प्रतीक्षायादीवरील ज्या अर्जदारांनी कागदपत्रे जमा केली होती. अशा अर्जदारांच्या कागदपत्रांची पडताळणी पूर्ण करण्यात आली असून, त्याचा निकाल दिनांक ०१.०४.२०२१ रोजी जाहीर करण्यात आला आहे. अर्जदारांना स्वत:च्या लॉगीनमध्ये जाऊन "माय ॲप्लिकेशन" वर क्लिक करुन पुढील प्रक्रियेकरिता शिफारस केलेले अथवा अपात्र असल्याचे पाहता येणार आहे. ज्या अर्जदारांना त्यांच्या लॉगिन मध्ये पुढील प्रक्रियेकरीता शिफारस (Recommended for Next Process) असे दिसून येते त्यांना पूढील प्रक्रियेबाबत माहिती लवकरच कळविण्यात येईल.

ज्या अर्जदारांचे अर्ज "पुढील प्रक्रियेकरीता शिफारस/ Recommended for Next Process" करण्यात आले आहेत, त्यांच्या कागदपत्रांमध्ये भविष्यात काही त्रुटी आढळल्यास माहिती पुस्तिकेतील तरतूद क्र. ८.९ प्रमाणे कागदपत्रांची फेरतपासणी करण्याचे अधिकार महामंडळास असून सदरहू अर्जावर नवी मुंबई जमीन विल्हेवाट (सुधारित) अधिनियम-२००८ अन्वये कार्यवाही करून त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास अशा अर्जदारांच्या सदनिकेचे वितरण रद्द करण्यात येईल.

ज्या अर्जदारांच्या कागदपत्रांची पडताळणी करताना तफावत आढळून आली आहे अथवा ज्या अर्जदारांनी कागदपत्रांची पूर्तता केलेली नाही अशा अपात्र अर्जदारांना अपिल करण्यासाठी संधी देण्यात येईल.त्याबाबत अर्जदारास निवारा संकेतस्थळाद्वारे कळविण्यात येईल. सदरची संधी अंतिम असून दिलेल्या कालावधी नंतर अपात्र अर्जदारांना अपिलाची कोणतीही संधी उपलब्ध करून दिली जाणार नाही तसेच एकापेक्षा जास्त वेळा विहीत कालावधीत अपिल करता येणार नाही.

अपीलाकरिता अर्जदारांनी सर्व कागदपत्रे त्यांनी घेतलेल्या अपॉईंटमेंटनुसार सोबत घेऊन यावीत.कागदपत्रांची पुर्नपडताळणी करण्यात येऊन पात्रतेबाबतचा निर्णय घेण्यात येईल व तो

संबंधित अर्जदारांना संकेतस्थळाच्या माध्यमातूनच कळविण्यात येईल. अपिलावरील अंतिम निर्णय महाव्यवस्थापक (गृहनिर्माण) यांचा असेल. संकेतस्थळावरून निश्चित केलेल्या भेटीच्या वेळेशिवाय अर्जदारांकडून कोणतेही अपील स्विकारले जाणार नाही. जे अर्जदार संपूर्ण प्रक्रीयेत अपात्र ठरतील अशा अर्जदारांनी कागदपत्रांतील त्रुटींची पूर्तता केल्यास सिडकोच्या भविष्यातील गृहनिर्माण योजनेअंतर्गत पुनःश्च अर्ज करून सोडतीद्वारे यशस्वी झाल्यास पात्र ठरू शकतील. अर्जदारांनी अपिलाकरीता सिडको निवारा केंद्र, आठवा मजला, टॉवर नं. १०, बेलापूर स्टेशन कॉम्प्लेक्स, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई – ४००६१४ या पत्त्यावर उपस्थित रहावयाचे आहे. अर्जदारांनी अधिक माहितीकरीता कॉल सेंटर नं. ०२२-६२७२२२५० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

सिडको महागृहनिर्माण योजनेतील प्रतीक्षायादीवरील अर्जदारांना स्वत:च्या लॉगीनमध्ये जाऊन "माय ॲप्लिकेशन" वर क्लिक करुन पात्र अथवा अपात्र असल्याचे पाहता येणार आहे.

१) अर्जदाराने cidco.nivarakendra.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.
२) स्वतःचे यूजर नेम (ॲप्लिकेशन नंबर) व पासवॉर्ड टाकून लॉगिन करावे.
३) नंतर My Application मध्ये जाऊन स्वतःचा पुढील प्रक्रियेकरीता शिफारस किंवा अपात्र चा status बघावा.